९२७

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ (थेट)
फॅक्स : २२०२९३४८
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/२०१२/सभा-१२४/(७७)/आ.४/१७८ दिनांक : २८.९.२०१२

प्रति,

1) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
2) मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
3) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
4) मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
5) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
6) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
7) प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
8) अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
9) प्रधान सचिव, (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
10) सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
11) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

विषय : दि.१४.८.२०१२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२४व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंगळवार दि.१४.८.२०१२ रोजी झालेल्या १२४व्या सभेचे इतिवृत्त आपले माहितीसाठी यासोबत सादर करण्यांत येत आहे.

सोबत : १२४ व्या सभेचे इतिवृत्त
पृ.क्र. १ ते ५

आपला विश्वासू,

(पंजाबराव वानखडे)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

लिपिक
राज्यमंत्री, नगरविकास, वने, बंदरे, खार जमीन, संसदीय कार्य, क्रीडा व युवक कल्याण व माजी सैनिकांचे कल्याण, विधी व न्याय आणि मत्स्यव्यवसाय
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

124meeting

प्रत :

१. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. जलव्यवस्थापन, ठाणे,/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे, /अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक, /नागरी व ग्रामीण योजना, ठाणे / मध्यवर्ती नियोजन, मित्तल टॉवर्स, मुंबई.
आपल्या संबंधित असलेल्या कार्यक्रम बाबींवर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

2. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई,
वित्त व लेखा शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१२ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

3. अधीक्षक अभियंता (समन्वय) म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र. ३,४,५, व ६ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

4. अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) म.जी.प्रा. ठाणे / नागपूर.
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.८ व ९ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

5. उप मुख्य लेखा अधिकारी (१) व (२) मजीप्रा., नवी मुंबई.

6. उप सचिव, पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,

7. आस्थापना अधिकारी (दक्षता) मजीप्रा, नवी मुंबई,
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र. १, २, ७, १० व ११ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

8. उप अभियंता, आय.टी.सेल, मित्तल टॉवर्स, मुंबई .

9. प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई,

10. कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

11. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी (आस्थापना- )/कार्यासन अधिकारी(आ- )
यांच्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

12. सर्व लेखा अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
रोख शाखा / गुंतवणूक व कर्ज रोखे / भ.नि.निधी व ग.वि.यो / निवृत्ती वेतन शाखा /

सर्व संबंधितांनी कार्यपूर्ती अहवाल दि.१०.१०.२०१२ पर्यंत सादर करावा. अंदाजपत्रक / वसुली शाखा / संकलन / अं.ले.परिक्षण / निधी /

124meeting

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२४ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२४ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. लक्ष्मण ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १४/०८/२०१२ रोजी संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते:-

१. मा.ना.श्री. लक्ष्मण ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री. जयंत पाटील, मा मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष.
३. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि. म. म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२.
५. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई ४०००३२.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते:-

१. श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागरी व ग्रामीण योजना, नवी मुंबई.
२. श्री. एन.एस. केरकर, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., जलव्यवस्थापन, ठाणे.
३. श्री. व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन व सल्लागार सेवा, पुणे.
४. श्री. एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (समन्वय) म.जी.प्रा.एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
५. श्री.आर.आर.जगताप, आस्थापना अधिकारी (दक्षता),म.जी.प्रा.एक्सप्रेस टॉवर्स,मुंबई

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१:**
**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२३ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दिनांक २९.३.२०१२ रोजी संपन्न झालेल्या १२३ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२:**
**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२३ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २९.३.२०१२ रोजी संपन्न झालेल्या १२३ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास सविस्तरपणे अवगत केले. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

२०/९

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव ,**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.३:**

**विषय:** पुर्ण झालेल्या तसेच पुर्णत्वास आलेल्या मात्र म.जी.प्रा. च्या योजना म्हणून नसलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्ती बाबत.

देखभाल दुरुस्तीपोटी सहा महिन्याच्या खर्चाचा निधी आगाऊ उपलब्ध करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

१. ज्या योजनांची पाणी पटटीची वसुली जिल्हा परिषदेमार्फत केली जाते, मात्र मजीप्रामार्फत करण्यात येत असलेल्या देखभाल दुरुस्तीपोटीच्या निधीची उपलब्धता मजीप्रास करुन देण्यात येत नाही. अशा योजना प्रथम बंद कराव्यात.

२. ज्या योजनांची पाणीपटटीची वसुली ८० ते ९० टक्के इतकी आहे. मात्र त्या तोटयात चालवाव्या लागतात अशा योजनांसाठी येणारा देखभाल दुरुस्तीचा खर्च व वसुल होणारी पाणीपटटी यामधील फरकाचा (Viability Gap) आढावा घेवून सर्व योजनांचा एकत्रित प्रस्ताव शासनास सादर करावा.

३. अशा सर्व योजनांच्या बाबतीत ३० ऑगस्टनंतर मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष,मजीप्रा, मा.मंत्री, ग्रामविकास तथा सहअध्यक्ष मजीप्रा,मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्ष मजीप्रा. मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच सदस्य सचिव,मजीप्रा. यानी एकत्रितपणे चर्चा करुन तसा सुयोग्य प्रस्ताव तयार करावा व तदनंतर मा.मुख्यमंत्री महोदयांकडे बैठकीचे आयोजन करुन योग्य तो निर्णय घेण्याची त्यांना विनंती करावी.

**कार्यक्रम बाब क्र.४:**

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समीतीने घेतलेल्या निविदा स्विकृतीच्या / अस्विकृतीच्या निर्णयावर शिक्का मोर्तब करण्या बाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समिती बैठक क्र.५४ ते ७४ व्या बैठकामध्ये निविदा समितीने निविदा स्विकृतीच्या/अस्विकृतीच्या घेतलेल्या निर्णयावर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब करण्याची विनंती कार्यक्रम बाबीव्दारे करण्यात येत असल्याबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

या अनुषंगाने चर्चा होवून कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.५:**

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समीतीने घेतलेल्या निविदा स्विकृतीच्या /अस्विकृतीच्या निर्णयावर शिक्का मोर्तब करण्या बाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समिती बैठक क्र.७५ ते ७७ व्या बैठकामध्ये निविदा समितीने निविदा स्विकृतीच्या/अस्विकृतीच्या घेतलेल्या निर्णयावर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब करण्याची विनंती कार्यक्रम बाबीव्दारे करण्यात येत असल्याबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

या अनुषंगाने चर्चा होवून कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव ,**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.६:**

**विषय :** एका कंत्राटदाराला जास्तीत जास्त किती कामे देण्यांत यावीत या बाबत घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करणे बाबत.

एका कंत्राटदाराला जास्तीत जास्त किती कामे देण्यात यावीत याबाबत मा.संचालक मंडळाच्या मान्यतेने मजीप्राने निर्गमित केलेल्या दिनांक १४.१०.१९९८ च्या परिपत्रकान्वये घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाचा फेर विचार करण्याची विनंती मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरिंग सर्व्हीसेस प्रा.लि.कोल्हापूर यांनी मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता यांचेकडे केली आहे.

त्याअनुषंगाने प्रस्ताव कार्यक्रम बाबीव्दारे मा.संचालक मंडळाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावावर सर्वकष चर्चा होवून, यापूर्वी घेतलेला धोरणात्मक निर्णय यापुढेही कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.७:**

**विषय :** प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांसह जिल्हा परिषद रायगड, अलिबाग कडे हस्तांतरीत झालेल्या कर्मचा-यांची सेवा प्रतिनियुक्तीची सेवा ठरविणे व निवृत्तीवेतन विषयक लाभ देणे.

रायगड जिल्हयातील उमटे,तोंडसुरे,खैरे व वारककुसडे या चार प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना रायगड जिल्हा परिषदेकडे योजनेवरील एकूण ५६ कर्मचाऱ्यासह दिनांक १.९.२००९ रोजी हस्तांतरीत करण्यात आल्या. हस्तांतरणानंतर दोन वर्षात सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन म.जी.प्रा.ने द्यावे व दोन वर्षानंतर पुढील कालावधीमध्ये सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन जि.प.रायगड (अलिबाग) यांचेमार्फत देण्यात यावे असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे हस्तांतरणाच्या करारनामा मध्ये नमुद करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे उपरोक्त दोन वर्षाच्या कालावधीमध्ये निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना मजीप्रामार्फत निवृत्तवेतन देण्यात आले, तथापि पुढील कालावधीमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचा-यांना जिल्हा परिषदेमार्फत निवृत्तीवेतन मंजुर करण्यात येत नाही. जिल्हा परिषद,रायगड (अलिबाग) यांचे ठराव क्र.५३१ दि.१९.११.२००९ नुसार योजनेवरील म.जी.प्राच्या हस्तांतरीत केलेल्या कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेमध्ये कायम स्वरुपी हस्तांतर करुन घेण्यास तयार नाहीत. त्यावर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात आला.

ठराव:

असा ठराव करण्यात येतो की, उमटे, तोंडसुरे, खैरे व वारक कुशेड या चार योजनांसह जिल्हा परिषद,रायगड (अलिबाग) यांचेकडे हस्तांतरीत झालेल्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी हस्तांतरीत करुन घेईपर्यंत सदर कर्मचारी जिल्हा परिषद,रायगडकडे प्रतिनियुक्तीने कार्यरत राहतील. त्यानुसार त्यांचे कायमस्वरुपी हस्तांतरणाचे आदेश रदद् करुन प्रतिनियुक्तीचे आदेश निर्गमित करणे, सेवानिवृत्ती वेतन विषयक लाभ म.जी.प्रा.तर्फे देणे याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव ,म.जी.प्रा.यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव ,**
**म.जी.प्रा.**

(६)

**कार्यक्रम बाब क्र.८:**

**विषय :** परदेशस्थ उत्पादकांची म.जी.प्रा. मध्ये नोंदणी करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव.

मे.टेक्नोकेम एजन्सीज प्रा.लि.मुंबई यांनी इस्त्रायल देशात उत्पादित केलेले Dorot कंपनीचे व्हाल्व तसेच मणिकांत ब्रदर्स,मुंबई यांनी चीन देशात उत्पादित केलेल्या ॲक्युप्लो कंपनीच्या जलमापकांची नोंदणी मजीप्रामध्ये करण्याची विनंती केली असून,त्यासाठीचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीव्दारे मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावावर चर्चा करीत असताना, मा.प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि. यांनी असे नमुद केले की, सदर दोन्ही उत्पादनांना मजीप्रात नोंदणी करण्यास हरकत नाही. तथापि, तत्पूर्वी सदर उत्पादने आपल्या देशात आर्थिक तसेच भौतिकदृष्टया सुयोग्य आहेत किंवा कसे याबाबत प्रथम अभ्यास करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे परदेशी कंपन्यानी पाणी पुरवठयाशी संबंधीत उत्पादित केलेल्या उपकरणांच्या अशा ३० कंपन्यांचे एक क्लस्टर निर्माण करावे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार अशा क्लस्टरना common facility centre करिता अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रामधील विविध उत्पादनांसाठी शासनाचा पाणी पुरवठा विभाग हा मोठा ग्राहक आहे. त्या अनुषंगाने हया क्षेत्रातील परदेशस्थ उत्पादकांना त्यांच्या साहित्याचे महाराष्ट्रात उत्पादन तयारी बाबत विचारणा करणेत यावी. तसेच त्यासाठी आवश्यक जागा तसेच इतर बाबीसाठी येणारा इतर खर्च त्या कंपन्याकडून केला जाईल किंवा कसे याबाबतचाही अभ्यास करावा,असे स्पष्ट केले.या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही सदस्य सचिव यांनी करण्याचे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.९:**

**विषयः** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील जुनी व खर्चीक वाहने निकालात काढून त्याजागी नवीन वाहने घेण्याचा प्रस्ताव मंजूरी बाबत.

म.जी.प्रा.मध्ये सध्या ११९ वाहने आहेत त्यापैकी ३४ वाहने ही निरुपयोगी आहेत ती निर्लेखित करुन नियमाप्रमाणे विक्री करावी व नवीन २६ वाहने घेणेबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. मजीप्रा.मध्ये सध्या कार्यरत १२९ वाहन चालक असून निरुपयोगी वाहने वगळून सुस्थितीत चालू असलेल्या वाहनांची संख्या तसेच प्रस्तावित २६ नवीन वाहने यांचा ताळमेळ घालून २६ नवीन वाहने विकत घेणेसाठी संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच चालू स्थितीत असलेल्या वाहनांवर देखभाल दुरुस्ती खर्च जास्त होत असेल तर त्याऐवजी अत्यावश्यक त्या ठिकाणी भाडयाने घेतलेली वाहने सद्यस्थितीत वापरणेबाबतची कार्यवाही तशीच चालू ठेवण्यात यावी असे संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला व पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठरावः**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी २६ नवीन वाहने खरेदी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे व त्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करणेस सदस्य सचिव,म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

20/9

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव ,**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.१०:**

**विषयः** कार्यकारी अभियंता,अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, बांधकाम विभाग, पुणे कार्यालयातील कार्यकारी अभियंता, या पदाचे नामाभिदान "कार्यकारी अभियंता तथा राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापक" (Exeutive Engineer and State Level Project Manager ) असे करण्या बाबत.

मुख्य अभियंता,अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक यांच्या अंतर्गत असलेले कार्यकारी अभियंता,अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, बांधकाम विभाग, पुणे कार्यालयातील कार्यकारी अभियंता, या पदाचे नामाभिदान "कार्यकारी अभियंता तथा राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापक" (Exeutive Engineer and State Level Project Manager ) असे करण्यात येत असल्याबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

या अनुषंगाने चर्चा होवून कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.११:**

**विषयः** श्री.व्ही.एम.महाजन, उप अभियंता (यां.) यांचा मुलगा कु.प्रतिक महाजन याच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या असल्याने त्यांनी किडनी प्रत्यारोपनाच्या अनुषंगाने डायलिसीस इत्यादीसाठी व्होकार्ट हॉस्पीटल, नागपूर या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील खर्चाच्या प्रतीपुर्तीस "विशेष बाब" म्हणून मंजुरी देणेबाबत.

मजीप्रा.मध्ये विषयांकित प्रकरणासारखे इतर किती प्रकरणे आहेत व अशी सर्व प्रकरणे मान्य करावयाची झाल्यास त्यावर मजीप्रास किती आर्थिक भार पडेल याबाबतची एकत्रित माहिती सादर करुन प्रस्ताव पुढील बैठकीत मान्यतेसाठी सादर करावा असा संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.१२:**

**विषयः** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने मजीप्राने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत.

मजीप्राने दि.२०.३.२०१२ ते १०.८.२०१२ पर्यंत केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. यावर सविस्तर चर्चा होवून सदर कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात येवून खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठरावः**

असा ठराव करण्यात येतो की, दि.२०.३.२०१२ ते १०.८.२०१२ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात येत आहे.

20/9

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव ,**
**म.जी.प्रा.**